# सायं.दै.महाराष्ट्र आरंभने नोव्हेंबरमध्ये प्रकाशित केलेल्या बातमीचा अंदाज खरा ठरला..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
**आरंभ**
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २५३ ■ रविवार दि.१ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 253 ■ Sunday Dt.1 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

**महेबुब मलिक ने कहरच केला, गोरगरिबांचे घरे उद्धस्त केले; प्रशासनाने त्याचवेळी नियंत्रण ठेवले असते तर आज ही वेळ आली नसती?**

## शहरातील नागरिकांसह सराफा व्यापाऱ्यास दिवसा तारे दाखवून मलिक पळाला, अरेबियन ज्वेलर्स विरुध्द अखेर गुन्हा दाखल?

# बीड शहरातील नागरिकांना मोठ-मोठ्या बक्षिसांचे आमिष दाखवून लक्की ड्रॉच्या नावाखाली अरेबियन ज्वेलर्सच्या मालकाने कोट्यावधी रुपये उकळले?

## सचिन ज्वेलर्सची २३ लाखाची फसवणूक, सोनं घेवून गेला तो पुन्हा आलाच नाही

### अमिष दाखवून फसवणाऱ्याला एस.पी.कॉवत साहेब मोक्का लावणार का?

### बीड जिल्ह्यात फसवणूक करणाऱ्याची टोळी सक्रिय

बीड । प्रतिनिधी

बुलेट, फोर व्हिलर, अलिशान फ्लॅट असे आमिष दाखवून येथील अरेबियन ज्वेलर्सवाल्याने सर्व सामान्य बीडकरांसह सराफा व्यापा-यालाही लुटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बीड शहरातील सचिन ज्वेलर्सकडून तब्बल २३ लाख रूपयांचे सोने घेऊन गेला तो पुन्हा परतलाच नाही अशी तक्रार व्यापारी सचिन डहाळे यांनी दिली आहे. या प्रकरणी अरेवियन ज्वेलर्सचा मालक महेबुब मलिक याच्याविरुध्द शहर पोलीस ठाण्यात कलम ४२०, ४०६ भांदवीप्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.तसेच याबाबत मागील काही महिन्यापूर्वी दैनिक महाराष्ट्र आरंभने एक बातमी प्रकाशित करून सदरील प्रकार उघडकीस आणला होता. यावर मागेच प्रशासनाने नियंत्रण ठेवणे गरजेचे होते. परंतु याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा प्रकार घडून आलेला असल्याची चर्चा सध्या ऐकायला मिळत आहेत. आणि दैनिक महाराष्ट्र आरंभचा अंदाज आज खरा ठरला आहे.




बीड शहरातील अनेक सर्वसामान्य नागरीकांना मोठ-मोठ्या बक्षिसांचे आमिष दाखून लक्की ड्रॉच्या नावाखाली अरेबियन ज्वेलर्सच्या मालकाने कोट्यावधी रूपये उकळले. त्यानंतर दिड महिन्यापासून ते दुकानही शटरबंद आहे. त्यामुळे सर्व सामान्यांमध्ये संभ्रम निर्माण झालेला असतांनाच आता अरेबियन ज्वेलर्सवाल्याने केलेले कारनामे पोलीस रेकॉर्डबर येऊ लागले आहेत. शहरातील पिंगळे गल्ली येथील सचिन ज्वेलर्समधुन अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबुब मलिक (वय ४४ रा. लक्ष्मण नगर बीड) याने दि.२९ मे २०२४ रोजी २३ लाख रुपये किंमतीचे ३१३ ग्रॅम सोने ग्राहकाला दाखवण्यासाठी नेले होते. याविषयी डहाळे यांनी वारंवार पैसे द्या किंवा सोने परत करा अशी मागणी केली. परंतू प्रत्येकवेळी त्याने उडवाउडविची उत्तरे देऊन फसवणूक केली अशी तक्रार सचिन ज्वेलर्सचे मालक सचिन डहाळे यांनी पोलीसांत दिली आहे. या प्रकरणी अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबुब मलीक याच्याविरुध्द शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोउपनि जाधव करीत आहेत.




## पालखी महामार्गावर ट्रकने दुचाकीस्वाराला चिरडले; एकाचा जागीच मृत्यू

### पालखी महामार्गावरील रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगा या अपघातात कारणीभूत?

### रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगाकडे आमदारांचे दुर्लक्ष; गुत्तेदारावर गुन्हा दाखल करा?




बीड । प्रतिनिधी

मेहकर-पंढरपूर पालखी महामार्गावर ट्रक दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या धडकेत दुचाकीस्वार चिरडल्याची घटना रविवारी दि.०१ जून रोजी घडली आहे. यात एक जण जागीच ठार झाला आहे. महारुद्र भीमराव लोंढे (रा.खालापुरी (बीड) असे मयत व्यक्तीचे नाव असून, तो तेलगावहून माजलगावकडे दुचाकीवरुन जात असताना अपघात घडला. तर, माजलगावहून तेलगावकडे जाणारा ट्रक (एम एच ४४ ७३७१) आणि दुचाकीची समोरासमोर झाली, ज्यात महारुद्र लोंढे जागीत ठार झाला. पालखी महामार्गावरील रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगा या अपघातात कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे.

टालेवाडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी महामार्ग बनवणाऱ्या गुत्तेदारावर गुन्हा नोंद करा या भूमिकेत प्रेताचा पंचनामा करण्यास पोलिसांना

▶ पान २ वर



## नळाला मोटर लावताना युवकाचा शॉक लागून मृत्यू

### पात्रुड येथील दुर्दैवी घटना

पात्रुड । प्रतिनिधी

घराचं काम चालू असताना बांधकामला पाणी मारण्यासाठी नळाला मोटर लावत असतांना विजेचा शॉक बसून २१ वर्षीय युवाकाचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना पात्रुड येथे घडली आहे. या घटनेने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

कृष्णा माणीक शितकर हा २१ वर्षीय युवक नवीन घरकामासाठी पाणी मारत असताना त्यालाविजेचा जबरदस्त शॉक लागल्याने तो बेशुध्द पडला होता त्याला तात्काळ माजलगाव येथील संजीवनी रूग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. मात्र त्यास डॉक्टरांनी मृत घोषीत केले. या घटनेने पात्रूड येथे हळहळ व्यक्त होत आहे. माणीकराव शितकर यांचा कृष्णा हा मुलगा होता. शितकर कुटूंबियांच्या दु:खात सायं. दै. आरंभ परिवार सहभागी आहे.






## वादग्रस्त पीएसआय रणजीत कासलेला दिल्लीतून उचलले, दोन दिवसांची पोलिस कोठडी

### लोकप्रतिनिधींची बदनामी, जातीय द्वेष निर्माण केल्याप्रकरणी कासलेला अटक

दिल्ली । वृत्तसंस्था

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येनंतर बीड जिल्ह्यातील पोलिसांच एक एक कारनामे समोर आले. त्यात बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासले यांच्या वक्तव्यांनी तर पोलीस खात्याची लक्तरं वेशीवर टांगली. त्यांनी अनेक धक्कादायक दावे केले. बीड कारागृहात असताना त्यांनी वाल्मीक कराड गाला चिकण, मटण आणि सर्व सोयीसुविधा देण्यात येत असल्याचा दावा



केला होता. कासले जामीनावर बाहेर आले होते. त्यानंतर त्यांनी पुन्हा त्यांच्या सोशल मीडिया खात्यावरून अनेक गौप्यस्फोट केले. सोशल मीडियावर नेत्यांची 'पोलखोल' करणं बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेला भोचलं. रणजीत कासलेला मुंबई गुन्हे शाखेने अटक केली. लोकप्रतिनिधींची बदनामी करण तसेच जातींमध्ये द्वेष निर्माण फेल्याप्रकरणी रणजीत कासलेला अटक करण्यात आली. रणजीत कासलेला दिल्ली येथे अटक करण्यात आली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

▶ पान २ वर

# हार-तुरे नको.... शुभेच्छा फक्त स्वीकारणार : राजेभाऊ फड

## जन्मदिवस साधेपणाने साजरा करण्याचे सर्वांना केले आवाहन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

वाढदिवस म्हणजे आपल्याशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकांसाठी शुभेच्छा देण्याचा दिवस असतो. येत्या ०३ जून रोजी माझा जन्मदिवस आहे. या दिवशी शुभेच्छा देण्यास अनेकजण इच्छुक आहेत. मात्र याच दिवशी लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी आहे. त्याचबरोबर राजकारणातील अत्यंत संयमी, शांत तसेच सामान्यांशी नाळ असलेले परळीचे भूमिपुत्र माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आर.टी.(जिजा) देशमुख यांचे नुकतेच निधन झाले आहे. या दुःखद प्रसंगात मी त्यांच्या कुटुंबियांच्या समवेत आहे. या पार्श्वभूमीवर आपला जन्मदिवस साजरा करणे उचित नाही. त्यामुळे आपल्या केवळ शाब्दिक शुभेच्छा स्वीकारण्यासाठी मी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील संपर्क कार्यालयात दुपारी २ ते ५ या वेळेत उपस्थित असणार आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी सांगितले आहे.



अत्यंत साधेपणाने वाढदिवस साजरा करण्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी कार्यकर्ते, समर्थक, आप्तस्वकीय आणि स्नेहींना नम्र आवाहन केले आहे. जन्मदिनाच्या दिवशी मी हार – तुरे स्वीकारणार नसून साधेपणाने सर्वांनी शुभेच्छा द्याव्यात असे त्यांनी आवाहन केले आहे. लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी तसेच परळी मतदारसंघातील भूमिपुत्र तथा माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आर.टी (जिजा) देशमुख यांचे नुकतेच निधन झाल्याच्या पार्श्वभूमीवर वाढदिवस मोठ्या स्वरूपात साजरा न करण्याचे आवाहन राजेभाऊ फड यांनी सर्वांना केले आहे. मात्र सर्वांच्या आग्रहास्तव केवळ शुभेच्छा स्वीकारण्यासाठी मी दिनांक ०३ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील कार्यालयात दुपारी २ ते ५ पर्यंत उपस्थित राहणार असून, आपली स्नेहाची, प्रेमाची आणि आपुलकीची भेट याच माझ्यासाठी शुभेच्छा असतील असे त्यांनी सांगितले आहे.

### दहा रुपये आणि विस रूपयांची फाटकी नोट बाजारात घेण्यास नकार वयस्कर व्यक्तीस व नागरिकांना त्रास

# फाटक्या नोटावर प्रशासनाने नियोजन करावे, सर्वत्र चर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

चीलर साठी चलन म्हणून विस रूपयांची नोट किंवा दहा रूपयाची नोट बाजारात चलन आहे. त्यामुळे चीलर चा तुठवडा पडत असुन वयस्कर




व्यक्ती नागरिकाना फाटकी नोट मुळे व्यापाऱ्यांचे व लोंका चे वादावादी होताना दिसत आहे. रोज च्या भानगडिला आळा घालण्यासाठी केंद्र प्रशासनाने एकादाचे नोट बदलून नागरिकाना दिलासा द्यावा किंवा जवळच्या इंटर नॅशनल बँकाना नोट बदलून देण्यासाठी सुचना काराव्यात असी सर्व नागरिका कडुन मागणी होत आहे.

दहा रूपयाची वे आणि विस रूपयांची नोट घेतल्या शिवाय व्यवहार होत नाही असे आहे एक तर चीलर साठी रोज नागरिकाची ओरड आहे कसे बसे चीलर म्हणून दहा रुपये किंवा विस रूपयांची नोट बाजारात आहे ती थोडी फाटकी किंवा मळकी असली की तो ग्राहक सागुन जातों नाही चलल्यास मि परत देईल विस रूपयांची किंवा दहा रूपयाची नोटाना बाझारात घेण्यास नकार आहे.

व्यापारी यांचे म्हणणे आहे रोज ग्राहकाचे बोलणे घ्यावे लागते व दहा चे रोकडा बाझारात कमी आहे. आणि रोज दहा आणि विस रूपयांसाठी रोज किरकीरी करावी लागते. म्हणून प्रशासनाने काही तोडगाकाढून नागरिकाची होणारी बेजारी थाबवावी. व्यापाऱ्यांचे व्यापारी लोक नागरीक वयस्कर वेक्तीस डोक्याला संताप झाले आहे म्हणून केंद्र प्रशासनाने एकादाचे नोट बदलून देऊंन होनारी बेजारी थाबवावी, तसेच खाजगी बँक मार्फत सवलत द्यावी दैनिक चालु वार्ता चे पत्रकार नाजेर कुरेशी यांनी प्रसिद्धपत्राव्दारे कळविले आहे.

# 'एमपीएल'मध्ये बीडच्या पाच खेळाडूंची निवड

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पाच खेळाडूंनी महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. यामध्ये सचिन धस (कोल्हापूर टस्कर्स), ऋषिकेश सोनवणे (पुणेरी बाप्पा), सौरभ नवले आणि देव नवले (सातारा वॉरियर्स), तसेच समर्थ कदम (रत्नागिरी जेट्स) या खेळाडूंचा सहभाग आहे.

ही निवड केवळ खेळाडूंच्या मेहनतीचे फलित नसून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पारदर्शक आणि गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या निवड प्रक्रियेचेही प्रत्यक्ष फलित आहे. अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रे, ब्रँडेड सुविधा आणि मोठ्या आर्थिक पाठबळाचा अभाव असूनही बीडचे खेळाडू राज्यस्तरावर चमकत आहेत, ही बाब निश्चितच जिल्ह्यासाठी गौरवाची आहे.

या यशाबद्दल खेळाडूंना बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, तसेच महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदींनी अभिनंदन केले आहे.

# जनसामान्यांचा आधार विकासशील लोकनेतृत्व नगरसेवक शेख आमेर आण्णा

बीड शहरातील गोरगरीबांना अहोरात्र मदत करणारे सर्व सामान्यांच्या सुख दुःखात सतत सहभागी असणारे लोकप्रिय मा.नगरसेवक म्हणजे शेख आमेर आण्णा होय. सर्व सामान्य कुटुंबात जन्म घेतल्याने ते दुखीतांचे अश्रू पुसण्यासाठी सतत तत्पर असतात. दवाखाना असो की नगरपरिषद, तहसीलचे काम ते अडल्या नडल्यांना सर्व सामान्यांना तात्काळ मदत करून आधार देतात. त्यांनी रात्री अपरात्री गंभीर रूग्णांना दवाखान्यात दाखल करून त्यांचे प्राण वाचविले असल्याने ते गोरगरीबांचे देवदुत मसीहाच आहेत. समाजसेवेत असताना लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी राजकारणात सहभागी होण्याचा निर्णय घेतला व ते सहभागी झाले व बीड शहरातील वार्ड क्रमांक –८ मधून निवडून आले नगरसेवक झाल्यानंतर त्यांनी आपला जनसेवेचा वसा अखंड सुरू ठेवला. आपल्या भागातील रस्ते, नालीचे प्रश्न सोडवले, पंतप्रधान आवास योजनेचा गोरगरीब कुटंबाला लाभ मिळवून देण्यासाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे. गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबाला मोफत रेशनची सुविधा मिळवून देण्यासाठी नवीन रेशनकार्ड उपलब्ध करून देऊन अनमोल आधार दिला आहे.

तसेच गंभीर रूग्णांना मोफत रक्त पिशवी देऊन त्यांचे प्राण वाचविले आहेत. कोरोना काळात त्यांनी कोरोनाग्रस्तांना उपचार मिळवून देत त्यांचे प्राण वाचविले आहेत तसेच लॉकडाऊन मुळे गोरगरीबांना उपासमारीचे दिवस आले होते त्यामुळे आमेर आण्णा यांनी गोरगरीबांना महिनाभर पुरेल एवढा किराणा देऊन त्यांना आधार दिला. पवित्र रमजान मध्ये शिरकुर्मासाठी लागणारे साहित्य किट देऊन त्यांनी गोरगरीब मुस्लिम कुटुंबाला आधार दिला. दिवाळीत हिंदू कुटुंबाला किराणा किट देऊन त्यांना अनमोल सहकार्य केले. त्यामुळे ते सामाजिक ऐक्य अबाधित राखणारे लोकनृत्य आहेत. सामाजिक सौहार्द राखण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. त्यांनी प्रभाग क्रमांक –८ चा विकास केलेला असून पुढील टर्म मध्ये शेख आमेर आण्णा आणखी विकास साध्य करणार आहेत. त्यांचा बीड शहरामध्ये खुप मोठा मित्र परिवार असून ते सर्व मित्र परीवारास अडचणीमध्ये सहकार्य करीत असतात. असे हे शांत, संयमी सर्व सामान्यांचे लोकप्रिय लोक नेतृत्व नगरसेवक शेख आमेर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



पान १ वरून...

### पालखी महामार्गावर ट्रकने दुचाकीस्वाराला चिरडले; एकाचा जागीच मृत्यू

मज्जाव केला. दरम्यान चार वाजेपर्यंत टालेवाडी फाट्यावर ग्रामस्थांनी गोंधळ घातला होता. सध्या स्थितीत चार वाजेपर्यंत दोन्ही बाजूने दोन ते तीन किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या असून जोपर्यंत कारवाई होणार नाही तोपर्यंत प्रेत उचलू देणार नाहीत ही भूमिका घेतली आहे.

### वादग्रस्त पीएसआय रणजीत कासलेला दिल्लीतून

सोशल मीडियावर लोकप्रतिनिधी आणि यंत्रणेला लक्ष केल्यामुळे सध्या चर्चेत रणजीत कासले सध्या चर्चेत आला आहे.

कासले हा निलंबित आणि बडतर्फ होण्यापूर्वी बीड पोलीस दलाच्या सायबर गुन्हे शाखेत पोलीस उप अधिक्षक होता. वाल्मीक कराड याचा एनकाऊंटर करण्यासाठी आपल्याला प्रस्ताव देण्यात आल्याचा दावा करून त्याने त्यावेळी खळबळ उडवली होती. आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून तो सतत काही ना काही खळबजनक दावे करत असल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. नुकताच तो जामिनावर बाहेर आला होता. आता त्याने पुन्हा एकदा बड्या नेत्यांविरोधात दावे केले होते.

याप्रकरणात करुणा शर्मा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात पोलीस उपनिरीक्षक रणजीत काळसे यांनी खुलासे केलेल्या नेत्यांवर उइख तथा केंद्रीय तपास यंत्रणामार्फत सखोल चौकशीची मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी जे आरोप केले आहेत, त्याचा सखोल तपास करण्याची विनंती मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

सदर घटनेनंतर मयत संजय नाईकवाडे यांचे वारसांनी अपघातग्रस्त वाहनाचे मालक व विमा कंपनी यांचे विरूद्ध मा. अध्यक्ष, मोटार अपघात दावे प्राधिकरण, बीड यांचे न्यायालयात बीड येथील अँड. अमोल बी. लांडगे यांचे मार्फत नुकसान भरपाई मिळावी म्हणून मोटार अपघात अर्ज क्र.२९२/२०१९ हा दाखल केला होता. सदरचे प्रकरणात अर्जदारांकडून साक्षीदारांची साक्ष व लेखी पुरावे सादर करण्यात आले. सुनावणी दरम्यान दोन्ही बाजूचे युक्तीवाद व साक्षीपुरावे तपासल्यानंतर बीड येथील मोटार अपघात दावे प्राधिकरण, बीड यांचे न्यायालयाने मयत सुरेश नाईकवाडे यांचे वारसांना नुकसान भरपाई रक्कम रू.१,५८,८४,२४६/– द.सा.द.शे.५% व्याजासह देण्याचा आदेश विमा कंपनीस केलेला आहे. त्याप्रमाणे विमा कंपनीने रक्कम रू. १,९४,५८,२००/– मा. कोर्टामध्ये जमा केले आहेत. सदर प्रकरणात अर्जदाराचे वतीने बीड येथील प्रसिद्ध विधीज्ञ अँड. अमोल बापुराव लांडगे यांनी काम पाहिले व त्यांना अँड. प्रतिभा एन. जरांगे, अँड. गणेश व्ही. काळे यांनी सहकार्य केले.

# रमेशराव आडसकर साहेब यांनी राजकारणात कार्यकर्त्यांना मोठे केले

'हाबाड़ा फेम', 'लोकनेते माजी आमदार सन्माननीय कै. बाबुरावजी आडसकर साहेब उर्फ 'तात्या' यांचे धाकटे चिरंजीव अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांचा आज एक जून रोजी वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात येत आहे. वडीलांचा राजकरणाचा वसा गेली तीस वर्षांपासून सक्षमपणे ते चालवत आहेत. सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालणे, जनतेच्या सूख दुःखात सहभागी होणे, गोर गरीब, दीन, दलीत. बांधवांना मदत करणे, हा वडिलांचा वारसा ते पुढे चालवतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, आडसची स्थापन कै.माजी आमदार सन्माननीय तात्या यांनी केली. गोरगरीब घरच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी खेड्या पाड्यात शाळा काढल्या तसेच केज व आडस येथे ज्युनिअर कॉलेज आणि महाविद्यालये काढली. त्यांनी काढलेल्या शाळेत शिकलेले मुले व मुली क्लास वन, क्लास टु, क्लास थ्री आधिकारी बनले आहेत. शेकडो विद्यार्थी डॉक्टर, इंजीनियर पदावर कार्यरत आहेत. आपल्या वडिलांनी शिक्षण रूपी लावलेल्या रोपट्याला झारीने पाणी घालण्याचे काम सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेबांनी केले. आज छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, आइसचे रूपांतर आज वटवृक्षात झाले आहे. सामाजीक, राजकीय, सहकार, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे कार्य नेत्रदीपक आहे. शारदा इंग्लिश स्कूल केज, वसंत विद्यालय व ज्युनिअर कॉलेज तसेच कै. माजी आमदार लोकनेते बाबुरावजी आडसकर साहेब वरीष्ठ महाविद्यालय केज, केज तालुक्यात टॉपवर आहेत. धारूर, केज, वडवणी, अंबाजोगाई, कळंब तालुक्यात साहेबांच्या सर्व शैक्षणिक शाखा गुणवत्ताधारक विद्यार्थी घडवत आहेत. सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेबांनी बदलत्या काळानुसार वेगळे वेगळे शैक्षणिक युनिट केज, धारूर, कळंब शहरात आणले आहेत. उदा. पॉलिटेक्नीक, डीफार्मसी, इंग्लिश स्कूल शाळा इत्यादी. रमेशरावजी आडसकर साहेब यांनी राजकारणात खूप कार्यकर्त्यांना मोठे केले आहे. सामान्य शेतकरी परीवारातील आसरडोह गावचे निष्ठावंतकार्यकर्ते छोट्या खेडेगावातील रहीवासी भारतराब पिंगळे यांच्या पत्नीला बिड जि.प.अध्यक्ष पद दिले होते. ग्रामपंचायत सरपंच, चेअरमन, पं.स. सभापती. मार्केट कमेटी सभापती, जि.प. सदस्य, डी.सी.सी. बँक संचालक, नगरसेवक, नगराध्यक्ष अशी शेकडो पदे सामान्य कार्यकर्त्यांना दिली आहेत. साहेब तुम्ही देत राहीलात इतके की, काही घेऊन घेऊन थकले.

उपकार तुम्हचे विसरून प्रेमास तुम्हच्या मुकले.

सन. २००२ मध्ये आसरडोह जी.प. सर्कलमधून निवडणूक लढवली व प्रचंड मतांनी विजय संपादन केला व जिल्हा परीषद बीड उपाध्यक्ष पद भुषवले. वेगवेगळ्या तीन तालुक्यातुन जी.प. सर्कल मधुन साहेबांनी विजय संपादन केलेला आहे. दीर्घकाळ त्यांनी जिल्हा परीषद बीड सभागृहात काम केलेले आहे. बीड जिल्यातील प्रत्येक खेडेगावात त्यांनी केलेली कामे पोहचलेली आहेत. उदा. सिमेंट रस्ते, लाईट, शाळा कंपाऊंड बॉल भिंती, शाळा खोल्या, नळ पाणीपुरवठा योजना, दोन गावांना जोडणारे डांबरीकरण रस्ते आसी असंख्य कामे त्यांनी केली आहेत.

'उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाला तुम्ही नवीन अर्थ दिला, तुम्हच्या दारी आलेला प्रत्येक जन समाधानाने घरी गेला.'

अवसायानात निघालेला अंबा सहकारी साखर कारखाना आपण गेली तेवीस वर्षांपासून उत्कृष्ट पध्दतीने चालवत आहात. सन. २००२ मध्दे बंद पडलेला कारखाना सुरू करण्यासाठी अनंत अडचणी आल्या. १९७५ साली स्थापन केलेल्या कारखान्याची सर्व मसनरी निकामी झालेली होती. पण सभासद बांधवांनी सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांच्यावर विश्वास टाकून सन. २००२ मध्ये आंबा सहकारी साखर कारखाना प्रचंड बहुमताने आडसकर साहेब यांच्या ताब्यात दिला. तत्कालीन सहकार मंत्री पतंगरावजी कदम साहेब यांनी मदत केली. लीक्वीडेशन मध्ये निघालेल्या अंबा सहकारी साखर कारखान्याला गत वैभव प्राप्त करून देण्याचे काम सन्माननीय आडसकर साहेब यांनी केले आहे.

निवडणुकीत आतोनात बिगरकामी होणारा खर्च टाळण्यासाठी विरोधकांना सोबत घेऊन अंबासहकारी साखर कारखाना बिनविरोध काढला. अंबासहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष पद दत्ता पाटील साहेब यांना दिले. तीन जिल्हात विस्तारित कार्यक्षेत्र असणार मराठवाड्यातील एकमेव सहकारी साखर कारखाना आहे. लातुर, बीड, धाराशिव, तीन जिल्ह्यात सभासद बांधव आज पण साहेबांचे उपकार मानत आहेत. कारण जेव्हा जेव्हा ऊस उत्पन्न वाढले तेव्हा तेव्हा शेतात वाळत चाललेला ऊस वाहणे पाठबुन



आणण्याचे पुण्याचे काम आडसकर साहेबांनी केले आहे. हजारों ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना आधार दिला. सध्या देखील कारखाना सुरू करण्यासाठी अनंत अडचणी असताना गेली तीस वर्षापासून राजकारणातील अनेक चढ उतार त्यांनी बघीतले. विधानपरीषद अथवा विधानसभा सभागृहात काम करण्यासाठी पक्षश्रेष्ठींनी त्यांना संधी देणे आवश्यक होते. परंतु प्रत्येक निवडणुकीत तिकीट वाटपात घोडेबाजार होतो भविष्यकाळात तरी त्यांना राजकारणात मोठी संधी मिळाली पाहिजे. एखादे काम घेऊन आलेल्या माणसाला तु कोण्या पक्षाचा, कोण्या पार्टीचा, कोण्या गटाचा हे त्यांनी कधीच विचारले नाही. फक्त आणि फक्त काम काय ते विचारले. काम होण्यासारखे आसेल तर पटकन काम करून टाकतात, काम होण्या सारखे नसेल तर काम होत नाही हे स्पष्ट पणे सांगतात. लोकांना झुलवत ठेवणे त्यांना अजीबात पटत नाही. सन्माननिय, आडसकर साहेब यांच्या एका फोनवर प्रशासकीय अधिकारी कामे करून देतात.

साहेबांचा एक एक शब्द लाख मोलाचा आहे.

आज पण केजला त्यांच्या घरी आलेल्या सामान्य माणसाला चहा पाणी घेतल्या शिवाय परत जाऊ देत नाहीत. सन्माननिय. कै. माजी आमदार आदरणीय तात्या देखील आडसला त्यांना भेटायला आलेल्या प्रत्येक माणसाला चहा पाणसुपारी घेतल्याशिवाय जाऊ देत नव्हते. सध्या देखील साहेब यांचे पुतणे, युवा, नेते. सन्माननिय ऋषीकेशजी भैय्यासाहेब आडसला त्यांना भेटायला आलेल्या माणसाला चहापाणी घेतल्याशिवाय परत जाऊ देत नाहीत. सत्ता असो अथवा नसो. आडसकर परीवार कायम जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी चोवीस तास कायम तत्पर असतात.

गेली पन्नास वर्षांपासून केज मतदार संघ राखीव असल्याने सन्माननीय, रमेशरावजी आडसकर साहेबांना राजकारण करत असताना खूप अडचणी येतात. नुकत्याच झालेल्या सन. २०२४ माजलगाव विधानसभा मतदारसंघात निवडणुकीत तिकीट वाटपात घोडेबाजार झाला. पैसे घेऊन तिकीटे वाटली गेली. माजलगाव व केज विधानसभा दोन्ही जागा शुअर असताना, मोठे पवार साहेब राष्ट्रबादी पक्षाला दोन्ही जागा गमवाव्या लागल्या. जर दोन तिकिटे सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांच्या मागणीनुसार दिली असती तर आज रोजी आमदार मोठे पवार साहेबांच्या पक्षाचे दिसले असते. साहेब अपक्ष लढले होते तरी देखील चाळीस हजार मते मिळवली आहेत. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात सर्व सोसियल मिडीयाच्या सर्वेमध्ये साहेब आघाडीवर होते पण साहेब यांना पराभव स्वीकारावा लागला. केज मार्केट कमिटी, धारूर मार्केट कमिटी, केज पंचायत समिती, धारूर पंचायत समिती, केज नगरपंचायत बीड.जी.प., डी.सी.सी. बँक, अंबा सहकारी साखर कारखाना, शिक्षण संस्था, विविध संस्थांच्या माध्यमातून राजकारणात साहेबांनी नावलौकिक मिळविला आहे. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, आडस, सहकारी संस्था, शिखर बँक, इतर अनेक क्षेत्रात गोरगरीच घरच्या शिक्षीत तरूणांना नौकरीला लावले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात आदरणीय, कै.तात्या यांच्या काळात व सन्माननिय रमेशरावजी आडसकर साहेब यांनी आजपर्यंत पंधरा ते वीस हजार गोरगरीच घरची मुले नौकरी ला लावले आहेत. केज तालुक्याच्या राजकारणातील उगवते तारे. युवा नेते. सन्माननिय ऋषिकेश भैय्यासाहेब व युवा नेते, सन्माननिय, रणजीत दादा साहेब सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय काम करत आहेत. सन्माननिय रमेशरावजी आडसकर साहेब यांनी पूर्ण वेळ जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतःला वाहून घेतले आहे.

सहकारी साखर कारखान्याचे धडाडी चे चेअरमन सन्माननिय. रमेशरवजी आडसकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आडसकर चषक २०२५ केज पंचायत समिती मैदानावर भव्य नाईट क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून संघ आले होते. २००९२१/– रूपये प्रथम पारितोषिक सोलापूर संघाने जिंकले. द्वीतीय पारितोषिक १००९२१/– रूपये धाराशिव संघाने जिंकले. तृतीय पारितोषिक ५०९२१/–रूपये परळी संघाने पटकावले. चतुर्थ पारितोषिक ३०९२१/–रूपये कड़ा संघाने पटकावले. स्पर्धेत सहभाग घेतलेल्या प्रत्येक संघाना देखील २०९२१/– रूपये पारितोषिक देण्यात आले. नाईट सामने खेळविण्यात आले. मैदानाची लाईट सिस्टीम हूबहू इंडियन आय. पि.एल. सारखी करण्यात आलेली होती. मराठवाडा आडसकर आय. पि.एल. चॅम्पियन चषक २०२५ ऐतिहासीक झाला. आठ दिवस केज शहरातील क्रिकेट रसिकांना मोठी मेजवानी मिळाली, राजकारणातील उगवते तारे. युवा नेते. सन्माननिय, ऋषीकेश भैय्यासाहेब व युवा नेते. सन्माननिय रणजित दादा साहेब यांनी क्रिकेट स्पर्धा उत्कृष्ट पार पाडण्यासाठी खुप परीश्रम घेतले आहेत. सन्माननिय रमेशरावजी आडसकर साहेब हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेत. चोवीस तास जनतेसाठी उपलब्ध राहाणारे नेते. गाडीला हात दाखवला आसता गाडी थांबवून अडचण विचारणारे नेते. गाडीची काच खाली घेऊन फिरणारे नेत. चारीत्र्यसंपन्न, स्पष्टवक्तेपणा, शिस्तबध्दपणा, असे सर्वगुणसंपन्न व्यक्तीमत्व आहेत. माजलगाव व केज मतदार संघात सन्माननिय, रमेशरावजी आडसकर साहेबांना मानणारा खुप मोठा जनसमुदाय आहे. परळी मतदार संघात देखील त्यांचे बांधील पंचवीस ते तीस हजार मतदार आहेत. कारण रेणापूर व अंबाजोगाई तालुक्यातील साहेब यांना मानणारी अनेक गावे परळी मतदार संघात गेलेली आहेत. संपूर्ण बीड जिल्ह्यात त्यांना मानणारा खुप मोठा वर्ग आहे. गेली तीस वर्षापासून आडसकर साहेब संपूर्ण वेळ गोरगरीब, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळ देत आले आहेत. उपमुख्यमंत्री सन्माननिय अजीत दादा यांनी सामान्य जनतेच्या भावना समजून घेऊन लवकरात लवकर सन्माननीय, आडसकर साहेब यांना विधान परिषदेची आमदार की देणे अथवा पक्षाची प्रादेशिक पातळीवर काम करण्याची संधी देणे. ही जनतेची अनेक वर्षांपासून मागणी आहे. येणारा प्रत्येक दिवस साहेबांच्या आयुष्यात भरभरून यश आणि आनंद घेऊन येवो, आयुष्यात तुम्हाला वैभव, आरोग्य, पद, प्रसिद्धी लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना!

# शिवराज्यभिषेक सोहळ्याला बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी उपस्थित रहा : गंगाधर काळकुटे पाटील



बीड । प्रतिनिधी

रायगडावर होणारा शिवराज्यभिषेक सोहळ्यामित्ति ६ जून रोजी 'लोकोत्सव' 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या आकर्षण ऐतिहासिक सोहळ्याचे बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी साक्षिदार व्हावे असे अवाहन शिवराज्यभिषक सोहळा समितीचे सदस्य गंगाधर काळकुटे पाटील यांनी केले. चौंडीच्या धर्तीवर रायगडावरही मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे शनिवार दि.३१ मे रोजी दुपारी १ वाजता पत्रकार परिषदेचे अयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी ऋषिकेश बेदरे पाटील, गोपाळ धांडे, संजय गोडसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना गंगाधर काळकुटे पाटील म्हणाले की, रायगडावर विविध विकास कामे व्हावेत यासाठी चौंडीच्या धर्तीवर रायगडावरही मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात यावी अशी मागणी राज्यभरातून होत आहे. या मागणीची शासनाने दखल घ्यावी.

शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला. मोठ्या थाटामाटात राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला. जन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची द्वाही दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२५ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. तरी बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी उपस्थित रहावे असे आवाहन गंगाधर काळकुटे पाटील यांनी केले.

**असे असतील कार्यक्रम**

**गुरुवार, दि. ५ जून २०२५**

दुपारी ०३.३० वा. राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधीस अभिवादन करून शिवराज्याभिषेक सोहळ्यास प्रारंभ (जिजाऊ समाधी स्थळ, पाचाड)

दुपारी ४.वा.–युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे भव्य स्वागत व शिवभक्तांच्या समवेत पायी गड चढण्यास प्रारंभ (स्थळ नाणे दरवाजा)

दुपारी ०४.१५ वा. गडपूजन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या उपस्थितीत, (स्थळः नगारखाना)दुपारी ०४.३० वा. युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या हस्ते 'धार तलवारीची.. युद्धकला महाराष्ट्राची.... युद्धकलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ (स्थळः होळीचा माळ)

सायं. ०७.०० वा. ढोलवादन, लेझीम प्रात्यक्षिके व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर (स्थळः होळीथा माळ)

रात्री ०८.०० वा. जागर शिवशाहिरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा... (स्थळः राजसदर)

रात्री ०१.०० वा. गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ (स्थळ: शिरकाई मंदिर)

रात्री ०९.३० वा. वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन (स्थळः अगदीश्वर मंदिर)

**शुक्रवार, दि. ६ जून २०२५**

सकाळी ०७.०० वा. युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे शुभहस्ते पारंपारिक वाद्यांच्या गजरात ध्वजपूजन व ध्वजारोहण (स्थळः नगारखाना)

सकाळी ०७.३० वा. शाहिरी कार्यक्रम (स्थळः राजसदर)

सकाळी ०९.३० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राजसदरेवर आगमन

सकाळी ०९.५० वा. – युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे राजसदरेवर आगमन

सकाळी १०.०० वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्या शुभहस्ते श्री शिवछत्रपती महाराजांच्या उत्सवमूर्तीस अभिषेक

सकाळी १०.२० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारूढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक

सकाळी १०.३० वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांचे शिवभक्तांना संबोधन

सकाळी ११.०० वा. 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा शिवराज्याभिषेक' पालखी सोहळ्यास प्रारंभ

दुपारी १२.०० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे जगदीश्वर मंदिर येथे आगमन

दुपारी १२:१५ वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायास पंढरीच्या वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान (स्थळः जगदीश्वर मंदिर)

दुपारी १२.२५ वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या समाधीस अभिवादन

# बीड जिल्हा लोणारी समाज सेवा संघाच्यावतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



बीड । प्रतिनिधी

लोणारी समाज संख्येने कमी असला तरी या समाजातील विद्यार्थी शिक्षणाच्या माध्यमातून आपलं अस्तित्व निर्माण करू लागले आहेत. पारंपरिक व्यवसाय लुप्त झाल्याने आता शिक्षणाशिवाय पर्याय उरलेला नाही. लोणारी समाजाला शिक्षणाप्रमाणेच नोकरीत संधी उपलब्ध व्हावी यासाठी समाजातील दोन होतकरू युवकांना संस्थेमध्ये संधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस बीड मतदार संघाचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

बीड जिल्हा लोणारी समाज सेवा संघाच्या वतीने लोणारी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन मारुती मंदिर, लोणारपुरा, बीड येथे करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. क्षीरसागर बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. योगेश क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे आणि दै. मराठवाडा साथीचे उपसंपादक तथा जिल्हा प्रतिनिधी ॲड. संदीप बेदरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीड जिल्हा लोणारी समाज सेवा संघाचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे नियोजक अनिल मुळेकर यांनी करून लोणारी समाजाबद्दलची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी बोलताना कल्याणराव आखाडेयांनी ओबीसी समाजातील विद्यार्थी युवकांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजना, विविध महामंडळे याची माहिती दिली. तसेच समाज संघटन मजबूत करून आपण समाजाचे समाजाची संघटना आपली ही भावना प्रत्येकाने मनात रुजवावी असे ते म्हणाले. तर ॲड. संदीप बेदरे यांनी मार्गदर्शन करताना गुणवंत विद्यार्थी खरोखरच भाग्यवंत आहेत. आपण मिळविलेल्या यशाबद्दल समाजाने आपल्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे. दहावी, बारावी प्रमाणेच पुढे चांगले शिकून उच्च पदस्थ अधिकारी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शैक्षणिक साहित्य पुष्पगुच्छ आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन गणेश अभिमन्यू मुळेकर यांनी केले. या कार्यक्रमास माणिक दोडमिसे, नामदेव खांडेकर, नुकुल मुळेकर, किरण निंबाळकर, सुरज दोडमिसे, विनोद मुळेकर, विनोद ढेंबरे, मंगेश ढेंबरे, मनोहर काका दोडमिसे, संजय उंडे यांच्यासह गुणवंत विद्यार्थी आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दानशूर, पुण्यश्लोक, लोकमाता रणनीतितज्ज्ञ, कर्मयोगिनी अहिल्यामाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड.विकास जोगदंड यांनी अहिल्यामातेंच्या अर्धकृती पुतळ्यास अभिवादन केले. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष राजेंद्र ससाने, जिल्हा सरचिटणीस गौतम खेमाडे, भिम स्वराज्य कामगार संघटनेचे आप्पा जोगदंड, मंगेश जोगदंड, सचिन जाधव, चंद्रकांत जोगदंड, महादेव वंजारे, आदर्शराजे जोगदंड, साहिल गायकवाड तेजस सावंत, कृष्णा माटे बाळू इनकर सह आदी उपस्थित होते.




गेवराईमध्ये लहुजी शक्ती सेनेच्या वतीने मातंग समाज मेळावा संपन्न. या मेळाव्याला उद्घाटक म्हणून लहू श्री विष्णू भाऊ कसबे यांनी मातंग समाज मेळाव्यासाठी मातंग बांधवांना आरक्षणाचा व जागृतीचा संदेश दिला. तसेच लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास दादा खंदारे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला लहुजी भक्त असंख्यपणे उपस्थित होते.



प्रनिता रामचंद्र बोराडे उर्फ सरपटे यांची लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ बीड येथे जिल्हा व्यवस्थापन म्हणून निवड त्यावेळी त्यांना शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी अभिषेक अडागळे, राहुल वैरागे, ग्रा.प.सदस्य महादेव लोंढे व गणेश पारवे इ. उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त बीड येथे पुष्पहार अर्पण

बीड । प्रतिनिधी



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्ष – एक प्रेरणादायक स्त्रीशक्तीला वंदन जयंतीनिमित्त बीड येथे पुष्पहार अर्पण करून पूजा करून वंदन करण्यात आले. या वेळी उपस्थित समाजसेवक प्रविण भाऊ पालीमकर व सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड संस्थापक अध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील, युवा कार्यकर्ते प्रकाश तावरे, डॉ. हानुमान पारखे सर यांनी विनम्र अभिवादन केले. तेजस्वी, न्यायनिष्ठ आणि दूरदृष्टी असलेल्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्माला ३०० वर्षे पूर्ण होत आहेत, आणि हा क्षण आपल्याला त्यांच्या कार्याचा पुनःस्मरण करून देतो. १८व्या शतकात, एक स्त्री म्हणून त्यांनी पुरुषप्रधान समाजात केवळ राज्यकारभारच नाही, तर धर्म, न्याय, आणि लोककल्याणाचा आदर्श ठेवलाय. त्यांनी काशीच्या विश्वनाथ मंदिरापासून ते सोमनाथापर्यंत अनेक मंदिरे पुन्हा बांधली. त्यांच्या कारकीर्दीत मालवा प्रांत एक आदर्श राज्य म्हणून ओळखला जात होता – जिथे न्याय, पारदर्शकता आणि जनतेची सेवा हे मुख्य तत्व होते.

अहिल्यादेवींचं जीवन म्हणजे कर्तव्य, श्रद्धा आणि माणुसकीचं प्रतीक. त्यांच्या स्मृतीस आणि आदर्शांना त्रिशताब्दीत वंदन करून आपणही त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया.

# बांधकाम कामगारांच्या पाल्याना मिळणार मोफत लॅपटॉप टॅबलेट लाभ घ्यावा : शेख अमर

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र शासनाने २०२५ मध्ये बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या अंतर्गत नोंदणीकृत कामगारांच्या मुलांसाठी एक महत्त्वाची शैक्षणिक योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना मोफत टॅब आणि लॅपटॉप वितरीत केले जाणार असल्याचं महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे प्रदेश अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांनी म्हटले.

कामगार संघटनेचे शेख अमर यांनी प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले, टॅब वितरण: पाचवी ते दहावी इयत्तेपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना टॅब दिले जाणार आहेत. या योजनेत पहिली ते चौथी इयत्तेतील विद्यार्थ्यांना समाविष्ट केले नाही कारण या वयोगटातील मुलांना तंत्रज्ञानाचा योग्य वापर समजत नाही लॅपटॉप वितरण: दहावी उत्तीर्ण झालेल्या आणि पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लॅपटॉप प्रदान केले जाणार आहेत. यामुळे त्यांना उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा फायदा घेता येईल. अर्ज सुरुवात: १ जून २०२५ पासून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होणार आहे. सदरील योजनेचा जिल्ह्यातील कामगारांनी लाभ घ्यावा असे आव्हान महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटनेचे राज्य अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांनी केले.

# तरटेवाडी येथे अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

दिनांक ३१ मे २०२५ वार शनिवार रोजी गेवराई तालुक्यातील तरटेवाडी येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा त्रिशताब्दी (३००) जन्मोत्सव सोहळा विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन मल्हार प्रतिष्ठान, तरटेवाडी यांच्या वतीने करण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सकाळी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यामध्ये मल्हार प्रतिष्ठानच्या अशोक केंगार, संतोष यमगर, रोहित खोड, गणेश ढेकळे, सर्जेराव मार्कड, शुभम माने, संतोष कारंडे, अक्षय खोड, अनिल कारंडे, अनिल काळे, संदीपपान कारंडे, सुरज मार्कड आदींनी रक्तदान करून जयंती साजरी केली. सायंकाळी सात वाजता पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या शौर्यावर सुप्रसिध्द गायक सुरेश रजवे साक्षी लातूरकर यांचा बहारदार संगीत रजनी गाण्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



यावेळी इंजिनिअर विष्णू देवकते (युवा मल्हार सेना संस्थापक अध्यक्ष), पांडुरंग कोळेकर (माजी पंचायत समिती सभापती), श्रीकांत सानप (भाजप तालुका अध्यक्ष गेवराई), सोमेश्वर गचांडे (गेवराई खरेदी विक्री संघ संचालक) ॲड. उद्धव रासकर , सुरेश मार्कड (सरपंच सिरसमार्ग), ह.भ.प.गणेश कोळेकर, दत्तात्रय कोळेकर (सरपंच बहादरपूर) पांडुरंग कारंडे, शरद मगर (मुप्टा संघटना जिल्हाध्यक्ष बीड), शरद शेजाळ (पत्रकार संचार भैय्या उमाप) (पत्रकार), अंकुश गवळी (पत्रकार) तसेच सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मंडळी या ठिकाणी उपस्थित होते.

दहावी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून ट्रॉफी, प्रशस्तीपत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यानंतर रात्री पुण्यश्लोक, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची गावातून मिरवणूक काढण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद मगर यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन मल्हार प्रतिष्ठान, तरटेवाडी केले होते. सर्व सदस्यांनी खूप मेहनत घेऊन हा त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा केला.

# नेते सुनीलभाऊ मगरे यांचा बीड शहरात एक दिवसीय दौरा

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा मुप्टा शिक्षक संघटनेचे संस्थापक सचिव नेते सुनीलभाऊ मगरे यांनी बीड शहरात एकदिवसीय दौरा केला. प्रथम बीड शहरात मुप्टा संपर्क कार्यालयात जिल्हाध्यक्ष शरदराव मगर व पदाधिकारी यांनी भाऊचा यथोचित सन्मान केला. आयु. शैलेश चिलवंत सर यांच्या नुतन वास्तूचा गृहप्रवेशास भेट दिली. आयु. रंजित इनकर यांच्या नुतन वास्तूचा गृहप्रवेशास भेट दिली. तसेच प्रा.सीमा ढवळे मॅडम यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष डॉ. संभाजी वाघमारे, तुलसी समुहाचे संस्थाचालक प्रा. प्रदीप रोडे, जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हासचिव प्रा.शशिकांत जावळे, जिल्हासचिव (ज्यू) प्रा.नारायण घोलप, जिल्हाध्यक्ष (मा) प्रविण तरकसे, प्रा. राम गायकवाड, अन्वर सर, जोंगदंड सर, हक्कदार सर, खोसे सर यांची उपस्थिती होती.



# भोगलवाडी ग्रामपंचायत मध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी




धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय भोगलवाडी येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यामध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेच पूजन करण्यात आले व महिला व बाल विकास विभाग यांच्या मार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन–२०२४–२०२५ हे पुरस्कार अंगणवाडी सेविका आशा वर्कर गावातल्या उत्कृष्ट महिलांना देण्यात आला त्यांनी चांगली कामगिरीही केल्याबद्दल ते पुरस्कार त्यांना देण्यात आला व शुभेच्छा देतानी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करताना उपस्थित ग्रामसेवक अधिकारी गायकवाड नंदलाल व सरपंच उपसरपंच रोजगार सेवक व ग्रामपंचायत सदस्य व आशा वर्कर अंगणवाडी सेविका व आदी मान्यवर उपस्थित होते.

# बिंदुसरा धरणाच्या मोठ्या चादरीवर वड - पिंपळाची झाडे; संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष

## नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन बेफिकीर : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्वाच्या बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड, पिंपळ आणि लिंबासारखी झाडे उगवली असुन चादरीच्या बांधकामासाठी धोकादायक ठरणा-या झाडांची छाटणी व काढणी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे ३ वर्षांपासून करून सुद्धा पाटबंधारे विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धरणाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तज्ञांच्या मते झाडांच्या वाढत्या मुळांमुळे पाणी झिरपण्याची प्रक्रिया आधिक सुलभ होते. जी भविष्यात चादरीला तडे जाणे,गळती होणे किंवा पुर्ण रचना कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते. यामुळे शहराच्या जलस्त्रोतासह हजारो नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे प्रशासनाने तातडीने चादरीवरील अशी जीर्ण झाडे हटवून भिंतीची डागडुजी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक ३ यांना केली आहे.



**३ वर्षांपूर्वी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी निमित्त जिल्हा प्रशासनाच्या वरीष्ठ आधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणुन सुद्धा दुर्लक्ष**

११ सप्टेंबर २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त बीड शहरापासून बिंदुसरा धरणापर्यंत बिंदुसरा नदीच्या काठांवर प्रत्येकी ८ अशा १६ किलोमीटर अंतर लांबीच्या परीसरात मानवी साखळी पद्धतीने बांबुची ५ हजार ९७० रोपट्यांची लागवड करण्यात आली होती. तेव्हा बिंदुसरा धरणाच्या पायथ्याशी तत्कालीन जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा, पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अजित पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले होते. तेव्हा त्यांना मुख्य चादरीवरील उगवलेली झाडे दाखविण्यात आली होती तसेच लेखी निवेदनाद्वारे झाडे काढण्याची मागणी केली होती मात्र ३ वर्षे उलटुनही अद्याप चादरीवरील झाडे काढण्यात आली नाहीत. त्यामुळे एकंदरीतच नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन याबाबतीत बेफिकीर असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक सिंचन प्रकल्पाची पावसाळा सुरू होण्यापूर्वी आणि पावसाळा संपल्यानंतर तपासणी केली जाते. त्या तपासणीत भिंत, सांडवा आदी बाबी पाहिल्या जातात.मग असे असताना बिंदुसरा धरणाच्या मान्सुनपुर्व तपासणीत मुख्य चादरीवर उगवलेली झाडे पाटबंधारे विभागाच्या लक्षात कशी आली नाहीत हा खरा प्रश्न आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

**हलगर्जीपणाचे गंभीर परिणाम बीडकरांना भोगावे लागतील : रामनाथ खोड**

बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड, पिंपळ, लिंबासारखी झाडे उगवल्याचे आम्ही ३ वर्षांपासून निदर्शनास आणुन देऊन प्रशासनाला निवेदन देऊनही प्रशासन दुर्लक्ष करत असुन ही झाडे जशजशी वाढत जातील. तसातसा धरणाच्या रचनेला धोका वाढेल. आज नाही तर ऊद्या त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. अनेक किल्ले, गड, ईमारती अशा झाडांमुळे ढासळलेली आपण पाहतो. त्यामुळे शासनाने तातडीने दखल घेऊन हि झाडे काढण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी केली आहे.



# १८ वर्षांपासून रखडला तागडखेल फाटा ते अरणविहरा रस्ता!

दौलावडगाव । प्रतिनिधी

तागडखेल, अरणविहरा, चिंचेवाडी, कारखेल या गावाला जोडणारा तागडखेल फाट्यापासून गावापर्यंत दीड किलोमीटर अंतरावरचा रस्ता अंत्यत खराब झाल्याने तब्बल १८ वर्षांपासून रखडला असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

आष्टी तालुक्यातील तागडखेल फाटा ते अरणविहरा गावाला जोडणारा दीड किलोमीटर अंतरावरचा रस्ता तब्बल १८ वर्षांपासून खराब झाल्याने याचे काम रखडले आहे. यामुळे या भागातील नागरिकांना अनंत अडचणीचा सामना करावा लागतो. तर पावसाळ्यात जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाकडून हा रस्ता त्वरित दुरूस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# आष्टी तालुक्यातील नकाशावरील सरकारी रस्त्यावर अतिक्रमणे; चक्क रस्ते झाले गायब!

दौलावडगाव । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सरकारी रस्ते, तसेच पाटबंधारे विभागाने तयार केलेले कालवे, त्यांच्या शेजारचे रस्ते, सर्विस रोड, पाणंद रस्ते, शिवरस्ते, या रस्त्यावर दंडेलशाही करत अनेक शेतकऱ्यांनी अतिक्रमण केले असल्याने गरीब शेतकऱ्यांसाठी हे रस्ते बंद झाल्याने अडचणीचा सामना करावा लागत आहे. नकाशावरील रसकारी रस्ते गायब झाले आहेत. अतिक्रमण करून रस्ते गायब झाले असताना प्रशासन काय करतय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून यात गांभीर्यपूर्वक लक्ष घालुन रस्ते मोकळे करावेत अशी मागणी केली जात आहे.

आष्टी तालुक्यातील धामणगाव, दौलवडगाव, दादेगाव, कडा, पिंपळा, खडकत, आष्टी, ब्रह्मगाव, पाटसरा, घाटापिंपरी, पिंपरी घाटा, देवळाली, लोंखडवाडी, डोईठाण, पांढरी, डोंगरगण, हरिनारायण आष्टा, यासह अनेक ठिकाणी रस्ते भूमी अभिलेख कार्यालयातील नकाशावर दिसत आहेत. परंतु अतिक्रमणामुळे ते बंद झालेले आहेत. त्याच बरोबर सार्वजनिक बांधकाम विभाग, अंतर्गत सरकारी मालकीचे रस्ते देखील तालुक्यातील भू माफीयांनी गिळंकृत केलेले आहेत. आणि सदरील रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे. पूर्वापार असलेले रस्ते नष्ट केल्यामुळे शेतकरी व नागरिकांच्या अनेक तक्रारी तहसील कार्यालयाकडे केलेल्या आहेत. परंतु अद्यापही त्याची दखल घेण्यात आलेली नाही अनेक गावी सरकारी रस्त्यांवर फळबागा, शेत तलाव, स्वत:च्या मालकीच्या सिंचन विहिरी तसेच नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत बंद करून बदलून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. या ठिकाणी रस्त्याची अडवणुक झाल्यामुळे शेतकऱ्यांनी इतर ठिकाणाहून रस्ते उपलब्ध करून द्यावेत अशा मागण्या वाढलेल्या आहेत. त्यामुळे अनेक गावी वादविवाद उद्भवल्याच्याही घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाल्याचे ही दिसून आलेले आहे त्यामुळे रस्त्यांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवण्याची मागणी होत आहे.

# अवकाळी पावसाने केळी बागेत मोठ्या प्रमाणात नुकसान

बीड । प्रतिनिधी

सध्या अवकाळी पावसाने महाराष्ट्रभर थैमान घातला आहे. त्यातच अनेकांची ही कांदा असेल केळी बाग असेल या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर सतीश जपकर राहणार तागडखेड तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी साडेआठ ते नऊ एकर जमिनीमध्ये मे महिन्यात केळीची लागवड केली होती व त्या केळीचा संगोपन केलं की त्यातून आपल्याला दोन रुपये मिळतील परंतु अवकाळी पावसाने त्यांच्या केळी बागेत मोठ्या प्रमाणात मुस्कान झालं. पन्नास टक्के नुकसान केळीचे त्यांच्या ठिकाणी झालं. अनेक केळीचे झाड उन्मळून पडले व त्याला असलेले केळी ही घडासकट खाली पडल्याने केळी बागेचा नुकसान झालं ४० /५० टक्के त्यांचा या ठिकाणी केळीची बाग खराब झाला ४५% मालाचा नुकसान झाले नाही ते सध्या बेचैन झाले आहेत तरी संबंधित प्रशासनाने नुकसान भरपाई देऊ अशी मागणी त्यांच्याकडून होत आहे.



# मांगवडगाव ग्रामपंचाययेतील भ्रष्टाचार उघडकीस आणणार : आशा शरद थोरात

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे मांगवडगाव ग्रामपंचायतीत लाखो रुपयांचा घोटाळा झाला असून तो उघडकीस आणला जाईल असे ग्रामपंचायत सदस्या आशा शरद थोरात यांनी सांगितले.

मांगवडगाव ग्रामपंचायतीत विद्यमान सरपंच व ग्रामसेवक हे ग्रामपंचायत सदस्यांना विचारत न घेता ठराव मंजूर करतात कसे? ठराव कुठल्या आधारावर मंजूर होतात याचे कुठलेही स्पष्टीकरण ना ग्रामसेवक देतात न सरपंच. १५ व्या वित्त आयोगाध्ये सामान खरेदीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच ग्रामपंचायतीत एकच रोड दोन ते तीन वेळेस मंजूर करण्यात येतो कसा? दलित वस्तीतील सामान खरेदीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आहे. घरपट्टीत, पाणी पट्टी यामध्ये सुध्दा यामध्ये देखील भ्रष्टाचार झालेला आहे. असे ग्रामपंचायत सदस्या आशा शरद थोरात यांनी सांगितले.



ग्रामसेवक आणि सरपंचांना या संदर्भात कागदोपत्री विचारणा केल्यास अरेरावीची भाषा करतात. असा आरोप अशा थोरात यांनी केला आहे. मांगवडगाव येथील ग्रामपंचायत सदस्यांनी मिळून विद्यमान सरपंच व ग्रामसेवकांना अर्जाच्या माध्यमातून संबंधित भ्रष्टाचाराविषयी विचारणा केलेली आहे. जर येत्या ०९/०५/२०२६ रोजी याविषयीच्या माहितीची पूर्तता ग्रामसेवक आणि सरपंच यांचेकडून झाली नाही तर केज पंचायत समिती समोर अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा आझाद क्रांती सेनेचे तालुका अध्यक्ष शरद थोरात यांनी दिलेला आहे.

# सततच्या अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी पंचनामे करून घ्यावेत

दौलवडगाव । प्रतिनिधी

देशासह जगाचे पोट भरणारा शेतकरी नैसर्गिक संकटांपुढे हतबल झाला आहे. यावर्षी तर अवकाळी पावसाने सिमाच ओलांडली. शेतकऱ्यांची पूर्व मशागतीची कामे तर तशीच राहिली. पण हाता तोंडाशी आलेला उन्हाळी कांदा, भाजीपाला, गुरांचा चारा, फळबाग व अन्य इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले. दि.१२ ते २७ मे २०२५ या पंधरवड्यात कोसळलेल्या सततच्या अतिवृष्टी व अवेळी आलेल्या पावसाने शेतांत काढणीस आलेला कांदा व साठवून ठेवलेला कांद्याचे जास्त नुकसान झाले.



उत्पादनात मोठी घट येणार. हातातोंडाशी आलेला घास अस्मानी संकटाने हिरावून घेतल्याचे चित्र परिसरात दिसत आहे. मराठवाड्यासह आष्टी तालुक्यात प्रशासनाला पंचनामा करण्याचे सूचना मिळाल्या आहे तरी दौलावडगाव, केळ, पिंपळगाव घाट, हरेवाडी, मराठवाडी, बांदखेल, सालेवडगाव अंभोरा व परिसरातील इतर गावातील बाधित शेतकऱ्यांनी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, यांच्याकडे माहिती देऊन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून घ्यावेत, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते महादेव सर्जेराव कोहक यांनी केले आहे.

# बीड एलसीबीची मोठी कारवाई; सात मोटारसायकल जप्त

## सहा लाखांचा मुद्देमाल जप्त, बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातून चोरी गेलेल्या दुचाक्या तळेगाव शिवारात विक्रीसाठी ठेवल्या असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने (दि.३०) शुक्रबार रोजी कारवाई करत चोरीच्या सात दुचाक्या जप्त करत आरोपीला अटक करण्यात आली आहे.

बीड जिल्हयामध्ये होणाऱ्या दुचाकी चोरीच्या गुन्हयामध्ये वाढ झाल्याने दुचाकी चोरीचे गुन्हे जास्तीत जास्त उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेनेशर्थीचे प्रयत्न सुरु केले होते. (दि.३०) शुक्रवार रोजी पो. ह भागवत शेलार यांना माहीती मिळाली की, अंबाजोगाई शहरातुन चोरी गेलेल्या गाड्या तळेगांव शिवारामध्ये घरामध्ये विक्रीसाठी ठेवल्या असुन त्याची डिल होणार आहे. या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोउनि सिध्देश्वर मुरकुटे व पथकाने तळेगाव येथे छापा मारला असता, आरोपी शेख ईलियास शेख गफार (वय २५) रा. तळेगांव ता.जि बीड. हा चोरीच्या गाड्यांसह मिळाला. आरोपीकडुन एकुण सात दुचाकी जप्त केल्या. त्या दुचाक्या अंबाजोगाई, जालना, छत्रपती संभाजीनगर येथुन चोरल्याचे आरोपीने सांगीतले. आरोपीकडुन एकुण पाच चोरीचे गुन्हे उघडकीस आले, असा एकुण ६,००,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख, पोलीस उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस हवालदार भागवत शेलार, विकास राठोड, दिपक खांडेकर, राहुल शिंदे, नितीन वडमारे, विकी सुरवसे, सुनिल राठोड, मच्छिंद्र बीडकर यांनी केली आहे.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पराक्रमी इतिहासाची महती आणि माहिती सर्व दूर पोचवण्याची आवश्यकता : आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची सोज्वळ आणि सात्विक प्रतिमा संपूर्ण भारत देशभर माहिती आहे, परंतु त्याचबरोबर कणखर नेतृत्व कुशल प्रशासक आणि पराक्रमी तलवार हाती घेऊन लढवय्या भूमिकेतील अहिल्यादेवींची महती आणि माहिती सर्व दूर भागात पोहोचवण्याची आवश्यकता असून त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवींची जयंती गावोगावी सार्वजनिक स्वरूपात साजरी व्हावी, असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले. आष्टी येथील पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या त्रिशताब्दी जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित शोभायात्रेमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर युवा नेते अभिजीत शेंडगे, नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर, प्रकाश सोनसळे, रामहरी महारनवर, रमेश गावढे, अशोक ढवण, मुकेश काळे इ. उपस्थित होते.

आ.सुरेश धस पुढे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी अत्यंत अल्पवयात राज्यकारभार हाती घेऊन कुशल निर्णय, कठोर भूमिका आणि जनतेच्या हिताचा प्रजा निष्ठ कारभार करून मोठा इतिहास घडवला आहे. भारत वर्षामध्ये परकीय आक्रमणामुळे हिंदू देवी देवतांच्या मंदिरांवर तोडफोड झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण भारत देशातील मंदिरांचा जीर्णोद्धार केला आहे. अनेक गावातील मंदिर पुनर्निर्माणाचे ऐतिहासिक कार्य अहिल्यादेवी यांनी केले आहे. अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा त्यांच्या हाती महादेवाची पिंड असलेली सात्विक, सोज्वळ ही प्रतिमा संपूर्ण भारत देशभर माहिती आहे परंतु पराक्रमी अहिल्यादेवींची घोड्यावर स्वार होऊन हाती तलवार घेऊन लढवय्या झुंजार सेनानी या भूमिकेतील प्रतिमा जनतेसमोर येण्याची आवश्यकता असून त्यासाठी गावोगावी सार्वजनिक स्वरूपामध्ये अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करावी असे आवाहन आपण काल केल्यानंतर संपूर्ण आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यामध्ये गावोगावी अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी झाली आहे अहिल्यादेवी होळकर यांच्या दूरदृष्टीपणाचे उदाहरण सांगताना आ.सुरेश धस यांनी त्यांनी किल्ल्यांवर जलसंधारणाचे काम त्यांनी केले असून युद्धकालीन परिस्थितीमध्ये पाण्याची टंचाई उद्भवू नये यासाठी त्यांनी मोठे हौद आणि पाण्याचे साठे निर्माण केले.

भारत देशावर परकीय शक्तींनी आक्रमण केले हे परकीय आक्रमक केवळ महाराष्ट्रातील लढवय्या आणि पराक्रमी असलेल्या शासकांना घाबरत होते असे इतिहासाचे दाखले असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या काळात बॉम्ब गोळे तयार करण्याचा कारखाना उभारला होता त्यांच्याकडे आरमार होते. या त्यांच्या दूरदृष्टीपणाची महती आणि माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत जाण्याची आवश्यकता आहे त्यासाठी आपण अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील साहित्याची पुस्तके मोठ्या प्रमाणावर खरेदी करून ग्रामीण भागामध्ये त्याचे वाटप करणार आहोत यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे असे सांगत त्यांनी प्रत्येक राष्ट्रपुरुषाला आपापल्या जाती मध्ये वाटण्याचे काम काही लोक करत आहेत हे चुकीचे असून महाराष्ट्रातील कोणताही राज्यकर्ता हा जातीसाठी न लढता सर्वसामान्यांना घेऊन मराठा म्हणून परक्यांशी लढला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखे दूरदृष्टी आणि प्रजादक्ष हितकारभाराचे उदाहरण देताना आ. सुरेश धस यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे लक्ष गोरगरीब शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान होऊ नये यासाठी लक्ष असे त्याचप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या देखील आपल्या घोडदळाकडून पिकांचे नुकसान होऊ नये यासाठी त्यांचे बारकाईने लक्ष होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती यावर्षीपेक्षा पुढील जयंती मोठ्या प्रमाणावर उपक्रमांनी साजरी करू असे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी आष्टी तालुक्यातील धनगर समाजाचे युवा नेते अभिजित शेंडगे बोलताना म्हणाले, पुण्यश्लोक राजमाता अहिल्या देवी होळकर यांची ३०० वी जयंती मोठ्या थाटामाटात साजरी होत आहे. या जयंतीचे औचित्यसाधून ३०० रुपयाचे नानं देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोटो चिटकवून खऱ्या अर्थाने अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाच्या गौरव करण्याचे काम केले आहे. याबद्दल देश आणि राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो. अहिल्यादेवी यांनी एका जाती चे काम न करता अठरा पगड जातींन सोबत घेऊन काम केले. त्याचप्रमाणे आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून संपूर्ण आष्टी मतदारसंघात जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. काही आपल्यातील लोक आ.धस यांना एका जातीच्या देखील घरट्यात अडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र त्यांना हे चोख आजच्या जयंती निमित्ताने चोख उत्तर असुन भव्यदिवे शोभा यात्रेचे फोटो पहावेत मग त्यांच्या लक्षात येईल आ.धस हे नेतृत्व कोणत्याही एका जातीय पुरतच मर्यादित नसले नसून अठरा पकड जातींना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व आहे. प्रास्ताविक ज्ञानेश्वर माऊली जरांगे यांनी केले. पाटोदा तालुक्यातील युवा नेते प्रकाश सोनसळे यांनी आपले विचार मांडले सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले यावेळी मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित होते.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT